# आरबीआय नाण्यांच्या वितरणासाठी एजन्सी नेमणार
**ऑगस्ट २९,२००२**

रिझर्व्ह बँकेने प्रायोगिक तत्वावर नाण्यांचे वितरण करण्यासाठी एजन्सींकडून अर्ज मागवले आहेत. रिझर्व्ह बँकेने अशा रीतीने नेमणूक केलेल्या, नाण्यांचे वितरण करणाऱ्या एजन्सींना सेवा शुल्क देणार असल्याचे म्हटले आहे. रिझर्व्ह बँक, काऊंटरवरुन घेतलेल्या नाण्याच्या प्रत्येक पिशवी मागे रु. २५० या प्रमाणे सेवा शुल्क देईल. एजन्सींनी ही नाणी जनतेमध्ये दर्शनी किमतीस कोणत्याही शुल्क/कमिशन विना वितरित करायची आहेत. ही रु. १, २, ५ तसेच २५ व ५० पैसे या दर्शनी किमतीची नाणी वितरणासाठी उपलब्ध असतील.

सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, सहकारी बँका, विभागीय ग्रामीण बँका, नामांकित राष्ट्रीय / क्षेत्रीय सामाजिक संस्था (शक्यतो सरकारी अनुदान मिळत असणाऱ्या) अशा संस्था जनतेमध्ये नाण्यांचे वितरण करण्यासाठी रिझर्व्ह बँकेशी संपर्क साधू शकतात. निवड झालेल्या एजन्सींना काही अटी पाळाव्या लागतील. या अटींमध्ये रिझर्व्ह बँकेकडून नाण्यांच्या पिशव्या घेतेवेळी, त्यांच्या पूर्ण मूल्यांचा भरणा रिझर्व्ह बँकेच्या काऊंटरवर करण्याच्या आवश्यकतेच्या अटींचा समावेश आहे. प्रत्येक नाण्याच्या पिशवीचे मूल्य खालील प्रमाणे आहे :

| | |
|---|---|
| पैसे २५ - | रु. १२५०/- |
| पैसे ५० | रु. २५००/- |
| रुपये १ - | रु. २५००/- |
| रुपये २ - | रु. ५०००/- |
| रुपये ५ - | रु. १०,०००/- |

ज्या संस्था रिझर्व्ह बँकेच्या काऊंटरवरुन अशा नाण्यांच्या पिशव्या नेतील त्यांना रिझर्व्ह बँक, प्रत्यक्ष असलेल्या पिशव्यांसाठी, प्रत्येक पिशवी मागे दरमहा सेवा शूल्क देईल. मात्र या पिशव्यांची वाहतुक व सुरक्षा व्यवस्था संस्थांना स्वखर्चाने करावी लागेल.

रिझर्व्ह बँकेने सांगितले आहे की, ती ही व्यवस्था सहा महिने अत्यंत निवडकपणे देऊ करेल. संस्थांची निवड, त्यांच्या पूर्वानुभवाच्या आधारे केली जाईल. बँका/संस्थांच्या, ही नाणी जनतेला वितरित करण्याच्या प्रत्यक्ष कामगिरीच्या आधारे, सुरुवातीचा काळ संपल्यावर, ती या व्यवस्थेचे नूतनीकरण करु शकेल.

एका महिन्याची नोटीस देऊन ही व्यवस्था कोणत्याही वेळी रद्द करण्याचा रिझर्व्ह बँकेला अधिकार राहील. व्यवस्था रद्द करण्याच्या सर्व बाबतीत रिझर्व्ह बँकेचा निर्णय अंतिम समजला जाईल.
इच्छुक संस्थांनी, रिझर्व्ह बँकेच्या अहमदाबाद, बंगलोर, भोपाळ, भुवनेश्वर, चंदीगड, चेन्नई, गुवाहाटी, हैद्राबाद, जयपूर, जम्मू, कानपूर, कोलकाता, नागपूर, नवी दिल्ली, नवी मुंबई (बेलापूर), पाटणा, तिरुवअनंतपुरम येथील विभागीय संचालकांशी, अथवा मुख्य संचालक, डिपार्टमेंट ऑफ करन्सी मॅनेजमेंट, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, सेंट्रल ऑफिस, मुंबई ४००००१ येथे संपर्क साधावा अशी रिझर्व्ह बँकेने विनंती केली आहे.

हे लक्षातच असेल की रिझर्व्ह बँकेने, जनतेपर्यंत नाणी पोहचविण्याचा एक उपाय म्हणून मुंबईतील टपाल अधिकाऱ्यांशी महाराष्ट्र व गोव्यांतील पोस्टां मार्फत नाण्यांच्या वितरणांसाठी व हिमाचल प्रदेश राज्य परिवहन महामंडळाशी, हिमाचल प्रदेशात वितरणाबद्दल करार केला होता.

**अल्पना किल्लावाला**
**महा व्यवस्थापक**

**प्रेस रिलीज : २००२-२००३/२३०**